

# ह्यो कुठला कायदा !

“ आज हम लोगोंकी जान गयी तो परवा नही, पर हम शनीमा देखनेंच वाले. ”

इनके मुरदे गये कबरिस्तानमें, क्या एकेक नवीच तऱ्हा काडतैय ! बगा की वो ! आमी म्हनं शनीमा बगायचा न्हाई ! रातीला बगीटलासा न्हव तुमी आमचं भांडान ? ह्येनी चाललं हुतं शनीमाला, कवा सटी सा म्हैन्यानं गेलो तर, आमी दोगंबी जातो शनीमाला आणि काल ह्येनी मला नगो म्हनाय लागलं तवा मी म्हनलं, ‘का ? मी का नगो ?’ तर ध्येनी म्हणलं, ‘अैसा हुक्म है जमातका ?’ कसला हुकूम म्हनायचा ह्यो ? म्हनं, आमा मुसलमान बायकासनी शनीमा दावूने ! शनीमा चांगला नसतोय ! म्हंजे आमीच्च तेवड्या बायका हाय व्हय ? बाकीच्या बायका न्हवंत ? वरं, शनीमा चांगला नसतोय तर मग आमा बायकावरच का बंदी ? त्योच शनीमा बापयासनी चांगला आसतोय व्हय ?’

मुजेभी घुस्साच आया. आणि मीबी म्हटलं, ‘फिर तुमीबी जाऊ नको !, तर ह्यांचं डोळं झालं की इंगळा-वाणी लाल ! म्हनले, ‘अरी तेरे सरमे भेजा है की नही ?’ ‘परवा वर्तमानपत्रातलं ऐकलियास न्हवं, कुण्या शेरात मुसमान न्हवराबायकू दोगं शनीमाला गेलं तर, तिच्या न्हवऱ्याला भरपूर मारून त्येच्या बायकूचं न्हाट कापलं !’

‘अजी सुनी हूं तो मैंभी ! पर ये जुलूम हमारेपरच क्यूं ? ह्येला काय रीत म्हनायची ? तुमी बापयानी कायबी केलं तर चालतयं आणि आमी बायकानीच काय पाप केलंय ? आमी बाईच्या जलमाला आलोय ह्यो गुन्हा हाय आमचा ?’

‘ये देख ! जादा बक बक करनेका नही, बोलकू रखता हु ! जेवडं सागीटलं तेवडं ऐकावं बायकानी !’

‘मेरा ये बकबक है क्या ? ये कौनसे किताबमे कौन लिखा है ? आमा बायकावर आसली बंधनं घाला-यला ! आणि लिवलंबी आसलं तरी, ते बरूबर हाय का ?’

‘हां ! हां ! लिखा है ! तू तो अक्लकी दुष्मन, तुजे क्या मालूम है ? आपल्या पुराणात बायकांचं नीतीव नियम सारं लिवल्याल हाय !’

‘व्हय ! औरभी येभी लिखी है ! शराब पीना हराम है ! चोरी करना हराम है ! जुवा खेलना हराम है ! पराये औरतको बुरी नजरसे देखना हराम है !’ ह्ये सारं तुमी किती बापयानी पाळलंय, ह्ये जरा आपल्या मनाला इचारुन बगा की ! उगंच कुराणाचं नाव सांगून कशाला आमाला दडपाय बगताय ! आदी आयन्यात त्वांड बगा सोताच ! तुम्हारा आसली रूप देखने मिलींगा तुमना ?’

आव ह्ये ऐकल्यावरुबर, पिसळून आंगावरच आलं की मारायला ! ‘क्यूं री, मुझे अकल शिखाती है ?’ आसं म्हनत वाट्टल तसल्या शिव्या द्यायला लागलं की! आता ह्येच्यात मी काय वाईट बोलल्ये ? आबो ! कुराणातलं नुसतंच कवा कवातर नाव घेत्यात ! आणि त्येबी दुसऱ्याला सांगायलाच ! मीबी कधीमधी कुराण ऐकलंयचकी. कुराणात लाख गोष्टी सांगितल्याल्या असतील पर वेव्हारात त्येचा उपेग कोन कसा करत्यात ह्ये काय ठाबं न्हाई ? माजा एक मावस भाऊ, ह्यो तर

देवाचं नाव घेतल्याबिगार तोंडात पाणी घ्यायचा न्हाई! पर ह्येच्या हातभट्टीवर सोळा गडी राबायचं! आमच्या ह्येंच तर बोलायलाच नगो. चार माणसं जमली की देवाधर्माच्या आणि कुराणाच्या गप्पा, पर आदन मदन दारू कधी सुटली न्हाई जसला, तमाशा, नाटकं, शनीमा ह्ये सारं चालूच ! आणि आता मला शनीमाला बंदी! ह्ये कुटल्या कुराणात लिवलंय ? आर्वा ! माज्या चुलत्यानं तर, जुगाराच्या पैशावर शनीमाचं थेटर बाधलं!

पर बापयासनी ह्ये पटलं, तर ते बापय कसलं ? आज मेराभी मगज थोडा गरमच हुया था ! न्हाईतर ह्यो कसला आन्योव आमच्यावर ? येवडंच कशाला, आमाला शनीमा बगाय बंदी, पर मग शनीमात काम करनाऱ्या बायका काय साऱ्या हिंदुच्याच हायत ? कितीतरी मुसलमानी नांवं ऐकल्यात की आमी ! मग भिरमिटून मीबी म्हनलं, 'वो बायकांको शनीमामे काम करनेकाभी बंद करके दिखाव तो ! तुम्हारेमे हिम्मत है तो !'

'हां ! हां ! वोभी दिखायेंगेच ! क्या समजती है तू ? त्येचाबी इचार केलाय आमी लोकानी ! थोड्या दिसात त्येबी करायचंच हाय !' नाक फुगवूनच त्येनी म्हनलं.

'तुमी लोकानी म्हंजी कोन ?' मी त्येंच्या तोंडापातूर हात न्हीवून इचारलं. तसं त्येनी घमांडीत म्हटलं, 'कोन म्हंजी आमी हितल्या जमातीच्या मंडळीनी !' त्यातत्येनी पाच सा नावंबी सांगीटली, आणि मला हासूच आलं. आणि ह्यासनी आला राग, म्हनले, 'हासनेकू क्या हुया री ?'

मी हासू आवरत म्हनलं, 'तो क्या रोना आयींगा? अजी तुमी चले शनीमाके बायकांको काम करना बंद करने ! आणि परवा ती कोन पाकीस्तानातनं, नूरजान-/का कोन आली हुती गाणं गाणारी, तवा तुमीच सारी मिळून म्हमईला गेला हुता न्हवं, तिचं गाणं ऐकायला ! अजी इसे क्या रीत कतैय ? फिर हासू नको तो क्या करूं ? कशाला उगंच आवसान आनतायसा कुनाचबी ऐकून !'

'ये देख ! जबान संभाळके बोल ! कुनाचं ऐकाय मला काय आक्कल न्हाई व्हय ! सांगीटलं नव्हं आजपासनं तुजा शनीमा बंद ! ह्येच्यात दुसऱ्याचं ऐकायचा काय संबध ?'

'आच्छा ! तो फिर तुमनाभी आक्कल हाय बोलनेका ! क्यूंजी ? तुमी दुसऱ्याचं ऐकून न्हाई आसं बंदी करत, तर मग आपून आट वर्स दोगंबी जातोय शनीमाला तवा ह्ये कदी डोक्यात नाही आलं तुमच्या ? आजच कसं जाग झालासा तुमा ?'

'फिर हैच क्या ? तुजे क्या करनेका ? बोलदिया उतर्ना सुनना ! माज डोस्कं गरम करू नगोस ! मला उशीर हुतोय ! मुकाट्यानं हुंबऱ्याच्या आत हुयाचं !' 'आसं म्हनत चालल्की ह्येनी ! मग मलाबी आवरलं न्हाई, न्हायले त्येंच्या आडवी आणि म्हनेल, 'फिर मेराभी सुनो ! जानेका है तो दोनो जानेका ! नही तो दोनोकाभी शनीमा बंद !'

'देख शाबीरा ! अभीभी मैं अछे तरेसे बोलतांव!' मला आडवणारी तू कोन ? गुमान बाजूला हो ! न्हाईतर जलमाची याद न्हाईल तुला !'

'मै कौन ?' डोस्क्यात जाळंच झाला माज्या ? 'मै कौन ? मै कौन नही तो फिर मुझको बंदी करनेवाले तुम कौन ?

'मे ? मै तेरा खाविंद हूं ! तेरा मालीक हूं ! समझी ? जोरु है तू मेरी !'

'हां ! तो मै जोरु हूं तुम्हारी ! कोई बिकत लायी चीज या जानवर नही ! जोरुकाभी हक्क है ना ? तुम्हारे सरीकाच !' आता त्यासनी बोलाय सुचत नव्हतं ! आणि शनीमाची येळबी निगून चालली हुती ! मला ढकलूनच ते गुमान निगून गेल की !

थोडा येळ मी तशीच न्हायले ! डोस्क्यात इचाराचा डोंब उसळला हुता ! ह्यो कुटला कायदा ? आमी जनावरांच्या पोटानं जलामलोय ? ह्ये का म्हणून सोसावं आमी ? आमी काय गोठ्यातल्या गायी म्हशी ? काय खुराड्यातल्या कोंबड्या ? का म्हणून ह्येनी आमाला आसं वागवावं आणि आमींबी का आसं खाल मान घालून मुकाट बसावं ? न्हाई ! ह्यो इचार डोस्क्यातनं उतू जाय लागला ! आजच्या आजच ह्येला उत्तर द्याय पायजे न्हाईतर ह्ये भूत कायमचं मानगुटी बसलं ! ह्यो इचार पक्का झाला आणि मी वरडून मोहल्ल्यातल्या माज्या सहेल्यासनी हाका मारल्या. तशा आठ-धा जणी

पळंतच भाईर आल्या. त्येंच्या कानातनी काय सांगायचं ते सांगितलं आणि आमी निगालो की तितनं !

आमी तितं गेलो तवा ह्येनी, आति ह्येंचं दोगं तिगं दोस्त तिकटं काढून पानपट्टीच्या दुकानात पान घ्याय लागलतं. आमी जाऊन सरळ तिकट काडली. आणि आता आत जाणार तवर आमच्या आडवं यीऊन न्हायलं की. ह्येंचं डोळ तर मला खाऊ का गिळू आसं दिसाय लागलं. खालचा व्हट चाऊन ह्येनी फुसफुसतच म्हणलं. 'मै क्या बोल्या था तुझे ? फिर क्यूं आयी ? '

'क्यूं बोलेतो ! पांवसे आयी ! तुम जैसे आये वैसेच आयी ! तसं त्येनी आपल्या दोस्तांकडं बगत म्हणलं 'साली ये बायका अभी भौत आगे जाने लगे. ह्यासनी चांगली आद्दल घडवाय पायजे ! चला ह्यासनी वडत न्हीऊ घराकडं ! ' ह्येंचं दोस्त फुडं हुवून माज्या सेहल्यासनी धराय गेलं, तवर त्या सहेल्यानी चप्पल काढून हातात घेतलं, आणि डोळं मोटं करून त्या एकदम वराडल्या, 'आगे पांव रखेंगे तो, इसी जुतेसे तुमारे सरके बाल निकाल देंगे हम ! ' तवा मग ह्येनी माजा हात धरून वडाय लागलं, तशा त्या सहेल्या फुडं धावल्या, आणि त्येंच्या हाताबनं मला सोडवून म्हणल्या. ' आज हम लोगोंकी जान गयी तो परवा नही. पर हम शनीमा देखनेचवाले ! '

आता तितं बरीच माणसं जमली. कोन काय ! कोन काय बोलाय लागली. शनीमाला आल्याल्या बऱ्याच बायका आमच्या भौती जमल्या आणि आमचं म्हणनं ऐकून त्याबी लागल्या आमच्यासारकंच बोलायला ! कुनाचं कुनाला नीट ऐकाय येईना ! ह्येंचा राग तर ऊतू जात हुता पर करत्यात काय ? सारीच माणसं आता त्येंच्या इरुद्द बोलाय लागली हुती. आता त्येंच्यात घरातलं आवसान न्हायलं न्हवतं. दात खान्याविगार आता त्यासनी काय करता येण्यासारकं न्हवतं ! तवर शनीमा सुरू झाल्याची घंटी वाजली आणि आम्ही साऱ्याजणी. त्यासनी बाजू दिऊन हुदाडीनं थेटरात घुसलो आमच्या आंगातबी आज जरा बळ आल्यावानी वाटत हुतं !

शनीमा सुटल्यावर थेटरभाईर यीऊन आमी बगीतलं तर आता ह्येनी बरीच माणसं जमवून आणली हुती. त्येंचा इरादा न्याराच दिसत हुता. कायतरी दंगा करायचं आणि आमासनी भिती घालायचं त्येंचं ठरलेलं असावं, माज्या सहेल्याबी थोड्या बिचकल्यावानी कराय लागल्या मग मीच फुडं हुवून आमच्या ह्यासनी म्हटलं, ' चलो ! घर जानेका है ना ?

' किसके घर आती है ? तेरे बापका घर रखा है क्या यहां ? ' नागावानी फुस्कारूनच ह्येनी म्हनलं.

' शादीके बाद, बापका घर यहां कैसा आयींगा जी ! शादीके बाद बेटीको बापका घर नहीं, उसके लिये उसका आपना घर होता है ससुराल ! '

' ससुराल तो तूने अभीसे गवां बैठी ! शनीमा बहोत प्यारा लगाना तुझे ? ' अभी सुसरालका नाम कायको लेती है ?' ह्येंचं दोस्तबी सारं आसंच कायबाय लागलं की बोलायला ! माज्या सहेल्यांच्या घरचीबी काई माणसं आली हुती तीबी आडवी तिडवी बोलाय लागली. तशी मी वरडून साऱ्या लोकासनी म्हनलं, आमी शनीमा बगीटला म्हणून गुन्हा केला ? ही आमची माणसं आमाला कावळ्यावानी टोच्या माराय लागल्यात ह्ये तुमी नुसतं बगत न्हानार हायसा काय ? तुमच्या लेकीवाळीवाणीच आमीबी बाईच्या जन्माला आलोय ह्येचा इचार करनार हाय का न्हाई तुमी ?'

ह्ये ऐकल्यावर लोकातनं एकापरास एकेक आवाज याय लागलं. त्यातच, पाच सा बाया पदर खवूनच फुडं आल्या, आणि त्येनी आमाला म्हणलं, 'चला गं ! आमी हाय तुमच्याबरुबर ! चला काय हुयाचं आसलं ते हुवूं दे. आणि मग त्या माणसांच्या लोढ्यासंगंच घराकडं आलो आमी! ह्ये सारं बगून आमचा सारा मोहल्ला हादबाडला. ये सब इतने लोकां देखको सारे डरनेच लगे जी ! आमच्या बरुबर आल्याल्या बायांनी आमाला घरात जायला सांगून म्हनल्या. 'जावा आता तुमी घरात ! काय कमी जास्त झालं, तर हायच आमी ! तुमी मातूर भिऊ नगा म्हंजी झालं !' असं म्हणून त्या गेल्या ! आमच्या ह्येनी आपल्या दोस्ता कडं बगत निमना खालचा व्हट चावून घेतला.

**– गुलाब नदाफ**
इचलकरंजी